Special Issue 3rd
Feb. 2016

ISSN-2250-0383
IMACT FACTOR-0.421

# SHODHANKAN

# 21ST CENTURY WORLD : PRESENT SCENARIO & CHALLENGES



**EDITOR**

**Dr. Pandit Nalawade**

Scanned by CamScanner

# INDEX

## 1. Human Rights and Social Justice and Problems of displaced population/refugees
## १. मानवी हक्क-सामाजिक न्याय व विस्थापितांची समस्या


१. **मानवाधिकार : भ्रम आणि वास्तव** २६
*डॉ. ज्योती धायगुडे, लोकप्रशासन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद*

२. **मानवी हक्काचे महत्व आणि अडथळे (आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दिशेने)** २९
*प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, देगलूर महाविद्यालय, देगलूर ता.देगलूर जि.नांदेड*

३. **मानवी हक्क व विस्थापितांच्या समस्या** ३५
*डॉ. सुनिल पिंपळे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, लोकसेवा, महाविद्यालय, गारखेडा, औरंगाबाद*

४. **मानवी हक्काचा समाजशास्त्रीय दृष्टिकोण** ३८
*श्रीमती शेख जहारा अब्दुल रहीम, विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग, लोकसेवा कला महाविद्यालय औरंगाबाद*

५. **मानवी हक्क : विस्थापितांची समस्या** ४०
*प्रा.ठोंबरे एम.डी. समाजशास्त्र विभाग प्रमुख, स्व.नितीन महाविद्यालय,पाथरी जि.परभणी*

६. **निर्वासितांची वैश्विक समस्या : एक आव्हान...** ४२
*डॉ. प्रभाकर रघुनाथ जगताप, राज्यशास्त्र विभाग, संत सावता माळी महाविद्यालय फुलंब्री,*

७. **माणुसच माणसाचे जगण्याचे हक्क जेंव्हा हिरावुन घेतो... विस्थापितांच्या समस्या** ४५
*सोळंके शारदा विजयकुमार - संशोधक विद्यार्थी*

८. **मानवी हक्क व सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून विस्तापित** ४८
*डॉ. चौकटे प्रकाश प्रल्हादराव, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर*

९. **महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्त विस्थापितांच्या समस्या : मानवाधिकार** ५१
*महेंद्र पांडुरंग पवार, संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.*

१०. **विस्थापित शेतकऱ्यांची सद्यःस्थिती व आव्हाने** ५४
*प्रा. सुर्यवंशी विश्वनाथ माधवराव, समाजशास्त्र विभाग यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई*

११. **मानवी हक्क आणि नेपाळमधील माओवादी गटाचा संघर्ष** ६०
*दत्ता मा. कुंचेलवाड, राज्यशास्त्र विभाग, नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय औंढा (ना) जि. हिंगोली.*

१२. **मानवी हक्क व सामाजिक न्याय - एक दृष्टीक्षेप** ६४
*प्रा.डॉ. कदम डी.एम., लोकप्रशासन विभाग, नागनाथ महाविद्यालय औंढा नागनाथ*

१३. **मानवी हक्क आणि सामाजिक न्याय व निर्वासितांची समस्या** ६७
*मकरंद रामराव गिरी संशोधक विद्यार्थी, स्वा.रा.ती.म.वि.नांदेड*

१४. **मूलभूत हक्क आणि राज्यसंस्थेचे उत्तरदायित्व** ७१
*देशमुख श्रीकांत हणमंतराव, संशोधन, केंद्र पीपल्स कॉलेज, नांदेड*


Scanned by CamScanner

# २. मानवी हक्काचे महत्व आणि अडथळे (आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दिशेने)

प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव,
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, देगलूर महाविद्यालय, देगलूर ता.देगलूर जि.नांदेड

२१ व्या शतकातील आंतरराष्ट्रीय राजकारणात मानवी हक्क हा परवलीचा शब्द बनला आहे. महासत्ताक राष्ट्रापासून ते अविकसित राष्ट्रापर्यंत सर्वांमध्ये मानवी हक्काचे संरक्षण व दमन यांची चर्चा सुरु आहे. मानवी हक्का विषयी वाढती चर्चाने मानवी हक्कास आंतरराट्रीय दर्जा प्राप्त केला.

प्रस्तुत लेखात मानवी हक्काविषयीची आंतरराष्ट्रीय राजकारणातील वास्तव परिस्थिती जाणून घेणे व मानवी हक्कांच्या संरक्षणार्थ प्रयत्न करणाऱ्या राष्ट्राची भुमिका व त्यांचा अन्वयार्थ समजून घेण्याच्या उद्देशाने चिंतन केले.

मानवी हक्काच्या संकल्पनेस आंतरराष्ट्रीय स्वरुप केव्हा प्राप्त झाले ? याचा विचार करता आपणास एलिनौर रुझवेल्ट यांनी माणूस म्हणून प्रत्येकाला जागतिक स्तरावर हक्क मिळावेत यासाठी तयार केलेल्या यादीचा विचार करावा लागतो. राजसत्तेला नियंत्रित करण्यासाठी १६४८ ला वेस्टफालियाचा तह झाला. धार्मिक स्वातंत्र्याचा पुरस्कार व गुलामगिरीच्या अधःपतनाविषयीचे चिंतन मानवी हक्काची जाणीव विकसित करते. १८१५ व्हिएन्ना परिषद, १८६२ चा वॉशिंग्टन करार, १८६७ व १८९० ची ब्रुसेल्स परिषद, १८८५ ची बर्लिन परिषद, पहिली व दुसरी पॅरिस घोषणा,१८६४ व १९०६ ची पहिली व दुसरी जिनेव्हा परिषद, पहिली व दुसरी हेग परिषद जी अनुक्रमे १८८९ व १९०२ साली झाली. आंतरराष्ट्रीय रेडक्रास संघटनेची स्थापना, १९२० चा राष्ट्रसंघ व १९४५ ची युनो या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या स्थापनेतून जागतिक स्तरावर मानवी हक्कास महत्व प्राप्त झाले. ज्याचा परिपाक १० डिसेंबर १९४८ साली युनोने घोषित केलेल्या मानवी हक्काच्या वैश्विक जाहिरनाम्यात झाला.

**अर्थ व महत्व :**

मानवी हक्क ही संकल्पना नेमकी केंव्हा उदयास आली, सांगणे कठीण आहे. तरीही लोकशाही शासनाच्या प्रक्रियेपासून मानवी हक्काची जाणीव विकसित झाली. मानवी हक्क ही तात्त्वीक व अर्थगर्भ संकल्पना आहे. संकल्पनेच्या पातळीवर मनुष्यत्वे भेदाभेद नाही. पण व्यवहाराच्या पातळीवर तफावत जाणवते. त्यामुळेच तीच्या संरक्षणार्थ अनेक अडथळयांची मांदियाळी उभी राहते.

मानवी हक्क या संकल्पनेचा सिध्दांताच्या पातळीवरचा प्रवास नैसर्गिक हक्कापासून प्रारंभ होतो. मध्ययुगीन काळात त्यास दैवी हक्काचे स्वरुप प्राप्त होते. लोकशाही प्रकियेच्या प्रारंभास कायदेशीर हक्कापासून नागरी स्वातंत्र्य आणि मानवी हक्क अशी वाटचाल होते. जॉन लॉक, थॉमस हॉब्ज व थॉमस पेन यांनी सरंजामी व्यवस्थेविरुध्दचा मांडलेला संघर्ष (Theory of right ) चा आहे. थॉमस हॉब्ज, जेरेमी बेंथम, ॲस्टिनने हक्काच्या रक्षणासाठी कायदयाचे अधिष्टान महत्वाचे मानले. ऐडमंड बर्क, सरहेन्री मेन, बर्डासनी हक्कांचा ऐतिहासिक सिध्दांत मांडला. टी.एच ग्रीन व इतर ब्रिटीश विचारवंताने आदर्शवादी सिध्दांत मांडला. हक्काच्या कल्याणकारी सिध्दांतातून बहुजन हिताय बहुजन सुखाय चा विचार पुढे आला.

मानवी हक्क ही अतिव्यापक संकल्पना आहे. जिचा सर्वव्यापी अर्थ सांगणे कठीण आहे. जगातील प्रत्येक व्यक्तिला सन्मानाने जगण्यासाठी अत्यावश्यक असणाऱ्या हक्कात मानवी हक्काचे प्रतिबिंब स्पष्ट जाणवते. प्रत्येक व्यक्तिला जन्मतःच राज्याविरुध्द प्राप्त झालेले हक्क. व्यक्तिच्या आंतरिक विकासासाठी आवश्यक अशी बाहय परिस्थिती होय. व्यक्तिला आपल्या वर्तमान व भविष्याचा वेध घेण्यासाठी पोषक परिस्थिती उपलब्ध होणे. यास मानवी हक्काचा भाग मानतात.



Scanned by CamScanner

मानवी हक्क म्हणजे नैसर्गिक हक्काचे लोकशाही धर्मनिरपेक्ष रुप होय. मानवी हक्क वैश्विक व परमोच्च आहेत. मानवी मुल्यांवरच मानवी हक्कांची पायाभरणी होते. मानवी हक्क हे मुलभूत हक्क आहे. स्त्रीया, आदिवासी, अपंग, बालके, पुरुष, वृध्द,वंचित,युवक,कामगार,विस्थापत, ग्राहक या सर्वांसाठी जिवनाधिकारी,यातना पासून मुक्तता,गुलामीपासून मुक्तता,कोर्ट सुनवाईचा हक्क,भाषण,वैचारीक व धार्मिक स्वातंत्र्य हे प्रमुख हक्क मानले आहेत. युनोने आपल्या जाहीरनाम्यात ३० हक्कांचा समावेश केला All human beings are born free and Equal in dignity and rights हे त्या हक्कातील मुख्य तत्व आहे. भारतीय संविधानाच्या कलम १२ ते ३५ मध्ये मुलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला.

व्यक्तिची प्रतिष्ठा व समानतेची आणि सन्मानाच्या जपणुकीत मानवी हक्क न्याय्य समजले जातात. मानवी हक्क जगा आणि जगु द्या यातुन व्यक्त होतात. मानवी हक्क विश्व बंधुत्वाशी निगडीत आहेत. मानवी हक्क व्यक्तिच्या विकासाची कवचकुंडले आहेत.

मानवी हक्काविषयी २१ व्या शतकात होणाऱ्या चर्चेवरुन त्या महत्व स्पष्ट होते. युनोच्या उदिष्ट पुर्तिसाठी मानवी हक्क महत्वाचे आहेत. व्यक्तितील जात,धर्म, भाषा, लिंग, अर्थ, प्रदेश इत्यादीच्या आधारावर होणारी भेदभावाची वागणूक संपवण्यात मानवी हक्कांची भुमिका महत्वाची आहे. जगातील सर्व प्रश्नाचे उत्तर मानवी हक्कांच्या मुळाशी आहे. मानवी हक्क मानवाला पडलेले एक स्वप्न आहे, ज्यांच्या पुर्तिशिवाय व्यक्तिला वसुदैव कुटूंबकम ची संकल्पना व्यवहारात आणता येणार नाही. वैश्विक स्तरावर लोकशाही व सामाजिक न्यायाच्या यशस्वीतेसाठी मानवी हक्क हे महत्वाचे साधन आहे. मानवी हक्कमुळे दशहतवादाचे निर्मुलन व पर्यावरण संरक्षणास बळ मिळते इतर व्यक्तिवर राष्ट्राविषयी सन्मान व प्रतिष्ठेची भावना मानवी हक्कातूनच जोपासली जावू शकते. व्यक्तिच्या सर्वांगिण विकासासाठी हक्क आवश्यक आहेत. हक्क व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाचा अविभाज्य भाग आहे. गूणवत्ता सद्सद्विवेक,न्याय बुध्दीच्या विकासासाठी हक्क गरजेचे आहे. मानवी हक्क राष्ट्राच्या स्वातंत्र्य व सार्वभौमत्वाचे रक्षण करतात. राष्ट्राच्या सर्वांगिन विकासाचे प्रतिक म्हणजे मानवी हक्क होय. राष्ट्राची प्रतिष्ठा व दर्जा वाढविण्याचे कार्य मानवी हक्क करतात मानवी हक्क राष्ट्राच्या जागतिक राजकारणातील भूमिकेला बळकटी प्राप्त करतात. मानवी हक्क सर्वांना एका समान सुत्रात बांधणारे वैश्विक सत्य आहेत. जागतीक प्रश्नांना सोडविण्याचे ते एक माध्यम आहे.

लोकशाही प्रक्रियेत आम आदमीची भाषा फक्त कोणत्याही देशात मतदानापुरती ऐकुन घेतली जाते. आश्वासन पुरतीची सक्ती नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणात मानवी हक्काचे महत्व वाढत आहे. मानवी हक्क राष्ट्रा-राष्ट्रातील परस्पर सबंधाचा आधार आहे. राष्ट्रांतर्गत मानवी हक्काच्या दर्जावरुन राष्ट्राची प्रतिष्ठा ठरते. काही राष्ट्रांच्य मते मानवी हक्क हा विषय आंतरराष्ट्रीय नसून तो राज्यीय आहे. जागतिक शांतता, लोकशाही, निःशस्त्रीकरण, कायदयाचे, अधिराज्य,प्रदुषण मुक्त विश्व, भितीमुक्त जग, युनोचे बळकटीकरण व उद्याच्या पिढीच्या भवितव्यासाठी मानवी हक्कांची उपयुक्तता आहे.

**मानवी हक्काच्या संरक्षणाचे प्रयत्न**

मानवी हक्काच्या संरक्षणाची जवाबदारी स्विकारुन युनोने बरेच प्रयत्न केले. मानवी हक्क उच्चायुक्त कार्यालय,मानवी हक्क समिती याप्रमुख जागतिक स्तरावर मानवी हक्काचे संरक्षण करणाऱ्या संस्था आहेत. ॲम्नेस्टी इंटरनॅशनल हयुमन राईटस वॉच, ग्रीन पीस, रेडक्रॉस, वर्डवाईड फंड फॉर नेचर या अशासकीय (NGO) संघटना, व जागतिक व्यापार संघटना इ. मानवी हक्कासाठी प्रयत्न करणाऱ्या संघटना आहेत.

मानवी हक्काच्या संरक्षणार्थ मानवी हक्क आयोगाव्दारे चर्चासत्र, कार्यशाळा, विविध संघटना व शासकीय यंत्रणाकडून स्पष्ट होणारे अहवाल, याविषयीची माहिती सर्व राष्ट्रांना पुरवते. मानवी हक्काच्या संरक्षणार्थ आवश्यक सहकार्य, साधन सामुग्री, तंत्रज्ञान, अर्थसहाय्य राष्ट्रांना पुरवतात.



Scanned by CamScanner

१९५६ सालापासून दर ३ वर्षांनी मानवी हक्काचा अहवाल सादर करण्याचे संकेत देण्यात आले. १९६६ साली वर्णभेद निर्मुलनाचा करार झाला. १९७३ साली मानवी हक्काच्या निर्मुलनार्थ विशेष कार्यकारी गट स्थापन करण्यात आला. ०३ जानेवारी १९७६ रोजी आर्थिक सामाजिक आणि सांस्कृतिक हक्काचा आंतरराष्ट्रीय करार करण्यात आला. ज्यात कामगार संघटना सामुहिक सुरक्षा, कुटूंबाचे रक्षण, जीवनस्तर सुधारणे, आरोग्य, शिक्षण इ. हक्काचा समावेश करण्यात आला. नागरी समाजातील सर्व घटक प्रयत्न करत आहेत.

२३ मार्च १९७६ साली भाषण व संचार स्वातंत्र्य, कायदयापुढे समान गुलामगिरीवर बंदी, शासन कारभारात सहभाग देणाऱ्या नागरी व राजकीय हक्काचा आंतरराष्ट्रीय करार करण्यात आला. दक्षिण आफिक्रेत वर्णभेदामुळे मानवी हक्कांची पायमल्ली होते. त्यावर प्रतिबंध करण्यासाठी म्हणून १९७६ साली दक्षिण आफ्रिकेवर बहिष्कार टाकण्यात आला.

अलिकडील काळात मानवी हक्काला रोखण्यात मानवतावादी हस्तक्षेप या नव्या संकल्पना व पर्यायाचा उदय झाला. ती एक प्रथा बंनली आहे. मानवतावाद हस्तक्षेपाबाबत युनोत घटनात्मक परतुद नाही. परंतु लष्करी हुकुमशाहा, दहशतवाद, वांशिक हिंसाचार, धार्मिक मुलतत्ववाद, अण्वस्त्रांचा प्रसार इ. मुळे मानवी हक्कांचे उल्लंघन होत असल्याची बोंब मारली जाते.

जागतिक व्यापार संघटनेच्या व्यासपीठावरुन होणाऱ्या व्यापार विषयक नियमावलीचा केंद्रबिंदू मानवी हक्क आहेत. पर्यावरणाच्या प्रदुषणातून मानवी हक्काचे उल्लंघन होते. याची जाणीव गतीमान बनली पर्यावरणीय हक्क हा मानवी हककाचाच भाग बनले. NIEO च्या माध्यमातून नैसर्गिक साधन संपत्तीच्या समान वितरणाची होणारी मागणी मानवी हक्काचा भाग आहे.

१९९८ साली आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाची स्थापना रोममध्ये करण्यात आली. युनो व इतर संघटना आणि राष्ट्रांमार्फत मानवी हक्कांच्या संरक्षणार्थ असे अनेक प्रयत्न झाले. तरीही मानवी हक्क संरक्षणाचे ध्येय पुर्ण झाले नाही. त्याची कारणमिमांसा करताना आपणांस भांडवलवाद विरुध्द साम्यवादाच्या संघर्षातून व बलाढय राष्ट्रांच्या वर्चस्ववादी राजकारण व अर्थकारणाच्या समिकरणाचा विचार करावा लागेल.

**अडथळे :** युनो या संघटनेकडे स्वतःची आर्थिक उत्पादनाची साधने नसणे. युनोची प्रशासकीय यंत्रणा व सैन्य व्यवस्था सुरळीत राबवण्यासाठी इतर राष्ट्रांकडून घ्यावी लागणारी मदत. युनो संघटनेपुढे येणाऱ्या मानवी हक्काच्या सर्व तक्रारी व उपाय फक्त शिफारसी पुरत्या मर्यादित आहेत. मानवी हक्कांच्या ज्या तक्रारी व प्रश्नात बडया देशांचे हितसंबध आहेत. त्या प्रश्न, अहवाल व शिफारशीची अंमलबजावणी होत नाही. एखादया राष्ट्राने, दहशतवादी संघटनेने मानवी हक्कांच्या उल्लंघनार्थ कृती केली व तसा कार्यक्रम आखून त्यास मुर्त रुप दिले. तर त्यास कठोर दंड देणारी यंत्रणा युनोकडे आजपर्यंत नाही. मानवी हक्काचा वैश्विक जाहिरनामा, महिलांचे संरक्षण, बाल हक्क संरक्षण, अपंगाच्या हक्कांची सुरक्षितता, आरोग्य शिक्षण, पर्यावरण, वंश - वर्णभेद, विषमता, दारिद्रय, शस्त्रास्त्र स्पर्धा, निःशस्त्रीकरण,दहशतवाद याविषयी दिलेल्या अनेक घोषणा व नारे कागदावरच आहेत. राष्ट्रा-राष्ट्रांतर्गत वाढती सत्ता स्पर्धा, नैसर्गिक साधनावर मालकी मिळविण्याची रस्सीखेच, राष्ट्रहित पुर्तीचे प्रयत्न, अर्थव्यवस्थेला उभारी देण्याच्या प्रयत्नातून सदैव ताण-तणाव वाढत जातात. परिणामतः मानवी हक्काच्या संरक्षणार्थ आंतरराष्ट्रीय सहकार्य होत नाही. मानवी हक्काबाबत राष्ट्र परस्परविरोधी भुमिका घेतात. या संकल्पनेची अतिव्याप्ती हेच तिच्या यशस्वीतेसाठीचा मुख्य अडथळा आहे. कारण आजचे जग पुर्णतः व्यवहारवादी व क्षणिक सुखाचा विचार करणारा आहे.

नव -उदारमतवादी व्यवस्था वापरा व फेकून दया, तसेच आर्थिक विषमता तीव्र गतीने वाढवत आहे. गरिबी निर्मुलन, पर्यावरण प्रदुषण रोखण्याचे धोरण नुसते कागदावरच आखले जातात. बहुराष्ट्रीय कंपन्या व कॉर्पोरेट लॉबी मार्फत स्विकारलेली धोरणे मानवी हक्कांच्या हननास कारणीभुत ठरतात. श्रीमतांच्या मनात



Scanned by CamScanner

गरिब, मागासल्याविषयीचा नकारात्मक भाव बळावण्यात या व्यवस्थेचा अधिक वाटा आहे. उदारमतवादी व्यवस्थेत व्यक्ति स्वातंत्र्याचा अतिरेक होतो. शाळेतील गुन्हेगारीचे वाढते प्रमाण, कौटूंबिक हिंसाचारांचे न्यायालयात वाढते खटले मानसीक विकृतीचे गुन्हेगारी रुपातरंण होत आहे.

अलिकडील काळात मानवी हक्काच्या संरक्षणाचे नारे देवून वातावरण निर्मिती करणाऱ्या व सर्वसामान्य माणसाच्या मनात नवी आशा पल्लवित करणाऱ्या NGO व तिचे कार्यकर्ते व म्होरके नव भांडवली व्यवस्थेचे हस्तक म्हणून काम करताना दिसतात. अराज्यीय घटकांना काम करताना मिळणारा अपुरा निधी व अधिक निधी मिळू नये यासाठी होणारे प्रयत्न, तसेच निधीच्या वाटप किंवा विल्हेवाटी संदर्भात होणारे आपसी मतभेद, गट-तट यात मानवी हक्कांच्या संरक्षणाचा प्रयत्न दूर रहातो. उलट मानवी हक्कांच्या संरक्षणार्थ एकत्र येणारे व्यक्तिगत स्वार्थपुर्तीसाठी मानवी हक्कांचे उल्लंघन करताना प्रसार माध्यमांतून दिसून येतात.
तर तिथे अहंभाव, स्वार्थ दुराभिमान जागा होतो. अशासकीय संघटनेचे राजकीय संघटना व राजकीय पक्षाच्या दिशेने वाटचाल होवून राजकारणात होणारा प्रवेश लोकशाही साठी उपयुक्त ठरेल. पण मानवी हक्काचे प्रश्न समजून घेण्याच्या प्रक्रियेत कवाडबंद व्यवस्था निर्माण करेल.

मानवी हक्कांच्या संरक्षणार्थ गाजावाजा करणारा बोथट पण पोट तिडकीने चर्चा करणारी इलेक्ट्रॉनिक व प्रिंट मिडिया TRP च्या जाळयात अडकत आहेत. भांडवलवादंयाचे बटिक बनले. नव भांडवली व्यवस्था किती व कशी चांगली आहे. तिचे व्यवस्थापन कौशल्य व चमक रंगवून व थटवून सांगण्यात धन्यता मानली जाते. याचा अर्थ मानवी हक्काच्या संरक्षणार्थ आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या युनो पासून ते सामाजिक स्त्रंस्थापर्यंत सर्वामध्ये राजकारणाचा शिरकाव झाला.

**अपयशांची कारणमिमांसा :**

मानवी हक्कांचे संरक्षण हे मानवी जाती समोरील प्रमुख आव्हान बनले. वर्तमान आंतरराष्ट्रीय जगतात सत्ता साधनांची असमान विभांगणी, वाढती आर्थिक विषमता, राष्ट्रनिहाय भिन्न परिस्थिती व सर्वांत महत्वाचे म्हणजे मानवी हक्काबाबतचे अज्ञान व दारिद्रय या घटकांचा वाटा अधिक आहे. हेन्री क्रिंसिजरने आपल्या **रिजन ऑफ नेशन्स** ग्रंथात निल्सन, फोर्ड आणि कार्टर या अमेरिकन अध्यक्षांनी मानवी हक्क संकल्पनेचा अमेरिकेच्या फायदयासाठी उत्तम राजकीय वापर केला. परंतु रोनाल्ड रिंगन व त्याच्या सहकार्यांनी त्याहीपुढे जाऊन खऱ्या अर्थाने मानवी हक्कांचा प्रभावी वापर साम्यवाद संपविण्यासाठी केला. या विधानाच्या संदर्भाने वर्तमान अमेरिकन राष्ट्राध्यक्ष बराक ओबामाची मानवी हक्कांच्या संरक्षणाची वैचारीक व व्यावहारिक भुमिका तपासता येते. एका बाजुने बराक ओबामा महात्मा गांधीच्या आदर्शाचा वाहक म्हणून स्वतःस जगासमोर आणतात. तर दुसऱ्या बाजुने इराक, अफगाणिस्तान युक्रेन, सिरिया राष्ट्राबाबतचे धोरण, दहशतवादाच्या निर्मुलनाबाबतची दुटप्पी भुमिका पाहता पुर्वीच्याच अध्यक्षाच्या धोरणाची आठवण करुन देतात. अमेरिका पुरस्कृत नाटो संघटनेचे सत्तेची बलस्थाने व सत्ता रचनेतील बदलाविषयी तडजोड करण्याच्या भुमिकेस असलेला विरोध. आंतरराष्ट्रीय संकेत, नियम धाब्यावर बसविणारी हिटलर व मुसोलिनीची प्रवृत्ती असणारे राष्ट्र व नेतें. राष्ट्रांच्या सार्वभौमत्व, स्वातंत्र्य व सन्मानास गुंडाळून बाजूला ठेवण्याचे धोरण बडया राष्ट्रांनी आखले.

जगातील विकसित, विकसनशील व इतर श्रीमंत राष्ट्रांचे ध्येयधोरण, कृती कार्यक्रम, जागतिक व इतर प्रश्नांची ध्येय धोरणे मानवी हक्कांचे उल्लंघन करणारे आहे. उदा : अमेरीका सारखा देश शस्त्रास्त्र निर्मिती व संरक्षणावर १००० बिलियन डॉलर्स खर्च करतो. तर गरिब देशांना विकासासाठी फक्त १०० बिलियन डॉलर्स खर्च करतो. याच अमेरिकेत व संबध युरोपात शाळा व महाविद्यालयात वाढती गुन्हेगारी प्रशासनासमोरील महत्वाचा विषय बनला. तर आर्थिक मदत गरजू राष्ट्राऐवजी लष्करशहा, जुलमी राज्यकर्त्यांना, पाक पुरस्कृत दहशतवादी व तालिबानी यांना अधिक मिळते. जगात युध्दखोर



Scanned by CamScanner

व लष्करी साधनसामुग्री विक्री करणारे देश मानवी हक्काचे शत्रु व उल्लंघन कर्ते आहेत. ज्यात अमेरिका, इंग्लंड, कॅनडा, रशिया, इटली, फ्रान्स, दहशतवादी संघटना व तिचे म्होरके यांचा प्रामुख्याने उल्लेख होतो. रवांडा देशात झालेल्या हुतु व तुत्सी जमातीच्या वांशिक संघर्षात ५ लाख लोक मारले गेले. यास रोखण्याऐवजी अमेरिकेसह इतर विकसित राष्ट्रांनी मूकसंमती दिली. २००३ साली अमेरिकेने इराक विरुध्द केलेल्या कार्यवाहीस कोणीच विरोध केला नाही. याच अमेरिकेने प्लालूजा शहर जिकल्यानंतर तेथील सार्वजनिक रुग्णालयात अत्याचार केला. मानवतावादी हस्तक्षेप या संकल्पनेअंतर्गत अमेरिका व इतर राष्ट्रांकडून मानवी हक्कांचे उल्लंघन होते. स्वतःचे स्वार्थ पूर्ण केले जातात. मानवी हक्काचे रक्षण हे अमेरिकेसह इतर पाश्चात्य देशांच्या परराष्ट्र धोरणाचे मुख्य उद्दिष्ट कधीच नव्हते, पुढेही राहील का या विषयी शंकाच आहे.

अशा अनेक प्रकारे मानवी हक्कांचे उल्लंघन राष्ट्रांकडून वेगवेगळया पध्दतीने होत आहे. मानवी हक्कांचे संरक्षक म्हणुन भुमिका बजावणारेच भक्षक बनले. कुंपनानेच शेत खाल्ले तर दाद कुणाकडे मागायची. अशा परिस्थितीत मानवी हक्काच्या संरक्षणात विकसीत व विकसनशील राष्ट्र एकमेकाकडे बोट दाखवण्याचे काम करत आहेत.

१९४८ पासुन ते आजपर्यंत मानवी हक्काचे उल्लंघन झाले. प्रामुख्याने अमेरीका, रशिया, इंग्लंड, फ्रान्ससह इतर बडी राष्ट्र यात अग्रेसर आहेत. नाटो, सिटो व वार्सा या संघटनांचा त्यात पुढाकार आहे. जॉन रॉल्स, हाबरमास, जेक्री रॉबर्टसन, पेरी अँण्डरसन व ब्रायन उरधार्ड यांच्या मते - राष्ट्राला दिलेले सार्वभौमत्व व समता या बाबी जगात शांतता निर्माण करण्याच्या प्रक्रियेतील महत्वाचा अडसर असून, त्यामुळे त्यांचा गैरवापर करणाऱ्यांना एक प्रकारे आपोआप संरक्षण व समर्थन प्राप्त होते. बडया राष्ट्रांनी सदैव मानवी हक्काकडे नकारात्मक दृष्टीने पाहिले. जनतेसाठी असणाऱ्या सामाजिक सेवा सुविधा नफ्यासाठी खाजगी क्षेत्राला बहाल केल्या. सर्वांना समान संधी म्हणत समाजाला बाजारपेठेच्या दावणीला बांधले. उदा.अमेरिका पुरस्कृत मार्शल प्लॅन, मानवतावादी हस्तक्षेपाचा वापर राजकीय वर्चस्वासाठी व स्वार्थासाठी होतो. मोठी राष्ट्र छोटया राष्ट्रावर आपली इच्छा लादतात.

मानवी हक्काच्या संकल्पनेत कोणत्या हक्काचा समावेश करावा व कोणत्या करु नये याविषयीचे मतभेद संरक्षणातील प्रमुख अडथळा बनले. १९९७ साली आसियान व्दारा आसियान रिजनल फोरम आयोजीत करण्यात आला. या प्रसंगी मलेशियाचे तत्कालीन पंतप्रधान महधीर मौहमद यांनी मागणी केली की, १९४८ च्या मानवाधिकाराच्या घोषणेसबंधी पुर्नविचार करणे गरजेचे आहे. मानवाधिकाराची ही संकपना जगातील महासत्तेच्या विस्तारवादी विचारधारेतून उदयास आलेली आहे. आणि ते विकसनीशल पुर्वकडील देशाच्या प्रकृतीच्या विरुध्द आहे. पर्यावरण आणि मानव अधिकाराच्या नावावर पाश्चिमात्य देश पुर्वकडील देशाना ठगत आणि लुटत आहेत. तसेच इंडोनेशियाचे माजी परराष्ट्र मंत्री श्री अलि अलतास म्हणतात जवळपास त्या १२० देशाना मानव अधिकार घोषणेच्या चर्चेमध्ये भाग घेण्याची संधीच मिळाली नाही. जे की, आज युनोचे सदस्य राष्ट्र आहेत.

अमेरिका व पश्चिमेकडील राष्ट्रे मानवी हक्कात व्यक्तिच्या राजकीय हक्कावर भर देतात. साम्यवादी, आशिया व अफ्रीकन राष्ट्रे आर्थिक व सामाजिक हक्कावर भर देतात. कारण या दोघांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत भिन्नता आहे. पश्चिमेकडील राष्ट्र प्रगत व विकसित आहेत. तर आशिया व आफ्रीकन राष्ट्र वाढती लोकसंख्या, गरिबी, उपासमार, वांशिक संघर्ष, मागासलेपणाच्या प्रश्नांनी ग्रासलेली आहेत. मानवी हक्काविषयी अविश्वासाच्या भावनेने एक नवीन पेचप्रसंग उभा केला. उभय जगातील बऱ्याच राष्ट्रात त्यांच्या पालन व संरक्षण प्रक्रियेकडे पहाण्याचा दृष्टिकोन नफेखोरी तर समता आहे. श्रीमंत राष्ट्र मानवी हक्काबाबत दुटप्पी भुमिका घेतात. मानवतावादी हस्तक्षेपाच्या नावाखाली मानवी हक्काच्या संरक्षणाचे नाटक रचुन गरीब राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचा



Scanned by CamScanner

बळी दिला जात आहे. संपूर्ण जगात वाढती एकाधिकारशाही, लष्करी हुकूमशाही, आयसिसचा दहशतवादी थैमान, खुलेआम दहशतवादाच्या जाळयात नवतरुण - तरुणींना अडकवण्याचे होणारे प्रयत्न राजेशाही व धार्मिक राजवटीचे प्रस्थ व लोकशाही शासनाचा अभाव इ. मानवी हक्काच्या संरक्षणातील अडथळे आहेत. दहशतवाद ही आंतरराष्ट्रीय समस्या बनली. दहशतवादातून मानवी हक्काचे हनन होते. तरीही युनो ही जगातील संघटना धृतराष्ट्रासारखी भुमिका घेते. फक्त अश्रु ढाळून दु:ख व्यक्त करण्यापुरती यंत्रणा बनते. बडया राष्ट्रांच्या हितसंबंधाना पुर्ण करण्यात धन्यता मानते. इंग्लंड, बांग्लादेश, फिजी, चीन, श्रीलंका, कॅनडा, तुर्की, इराण, पाकिस्तान, बेल्जियम, ब्रह्मदेश, स्पेन, इस्त्रायल, सिरिया, युक्रेन सह अनेक देशातील वाढते वांशिक संघर्ष, अणवस्त्राचा वाढता प्रसार मानवी हक्काच्या संरखणातील अडथळा आहेत.

मानवी हक्क व्यक्तिच्या विकासाचे प्रमुख साधन आहे. आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत मानवी हक्कांविषयीचे दिसणारे नकारात्मक चित्र बदलण्याची ताकत मानवी मन,मेंदू व सहकार्यात आहे. त्यादिशेने जगाची वाटचाल सुरु आहे. विविध प्रादेशिक संघटना, जागतिक व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या माध्यमातून प्रयत्न होत आहे. लोकशाही करणाची प्रक्रिया वेग धरत आहे. माहिती तंत्रज्ञानाने लोकशाही स्थिर,गतिशील व पारदर्शक बनत आहे. लोकशाही व्यवस्थेत मानवी हक्क, व प्रतिष्ठा यासबंधी प्रशिक्षण देण्याची आणि ते आचरण्यात आणण्याची गरज आहे.

अब्राहमन लिंकन, मार्टिन ल्युथर किंग, ऑन सॉग सुची, महात्मा गांधी, नेल्सन मंडेला, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,दलाई लामा अशा अनेक महान विभुतीनी मानवी हक्कांच्या संरक्षणार्थ दिलेला वैचारीक वारसा जगासमोर वारंवार मांडावा.

मानवी हक्कांच्या संरक्षणार्थ चर्चासत्रे,शिबीरे,संमेलने,भिंती पत्रके, व्याख्यानमालेचे आयोजन करावे.शिक्षण,रोजगार व आरोग्याचे प्रश्न सोडवण्यावर भर दयावा. हिंसा प्रश्न सोडवण्याचा प्रभावी मार्ग असल्याचे मोठया राष्ट्रांना व दहशत वादयांना वाटत असले तरी अहिंसा, परस्पर विश्वास, अनाक्रमण,अहस्तक्षेप, निशस्त्रीकरण, शांतता व सहकार्यातून विकासाचे धोरण आखावे. जगाच्या पटलावरील प्रत्येकांने आपापले पात्र माणूस म्हणून वटवावे. ज्यातून यातना व हिंसा मुक्त विश्व निर्माण होईल.

**संदर्भ**


१) आंतरराष्ट्रीय संबंध डॉ. शैलेन्द्र देवळाणकर

२) मानवी हक्क - प्रा.व्हि.बी.पाटील. के सागर पब्लिकेशन पुणे

३) मानवी हक्क आणि सामाजिक न्याय - प्रा.पी.के.कुलकर्णी. डायमंड पब्लिकेशन्स पुणे.

४) मानंवी हक्क प्रश्न आणि उत्तरे - लिया लेव्हिन, अनुवाद,-विकास देशपांडे, नॅशनल बुक ट्रस्ट,इंडिया.

५) मानवी हक्क तत्व आणि दिशाभुल,उध्दव कांबळे- साकेत प्रकाशन,औरंगाबाद.

६) Basava & Human rights - Dr. Lohit D. Naikar, Basava Samiti Bangluru.


❖❖❖

Scanned by CamScanner